# Institutional Distinctiveness

## Department of Music

## Some Salient Features

The institution has a separate Music Department which provides undergraduate and post-graduate degree in Music through the affiliating university (SPPU). Ours is the only music department in SPPU which offers post-graduate degree in "Raag Sangeet Gayan" course for women.

1) To create interest and preserve the rich cultural heritage of Music in India the then Maharashtra government has taken a big step for the growth and promotion of music as a subject by sanctioning 100 % grant to the College.

2) Among the colleges affiliated to Savitribai Phule Pune University Pune, the Department of Music in the said college is the only 100% granted department.

3) Out of the colleges affiliated to Savitribai Phule Pune University Pune where music is taught, the facility of music education at postgraduate level is available only in the Department of Music in this college.

4) Since 2009-10 the subject of music has been introduced at the postgraduate level, and facility has been created to impart education of Music for women students in Malegaon taluka.

5) Along with women students from rural areas around Malegaon taluka, women students from Nashik district and other places also benefit by taking admission in this college.

6) Many students have successfully completed their degree and post-graduate education in music through this college and have become music teachers at various places and are striving to promote and spread music and brighten the name of the college.

7) There are trained, meritorious, full time and devoted teachers in the department.

8) The institute has provided a separate building for classes and adequate class rooms for the department.

9) Necessary instruments for accompaniment are available in the department.

10) The department has its own library.

11) Musical recordings of Ragas (Classical Music), Semi-Classical music, Light music, Folk music etc. are available in the form of cassettes and CDs in the department.

12) Special emphasis is given by the colleagues in the department on personal development of students.

13) 100 % result is the tradition of the department

14) Various singing competitions are regularly organized by the department every year in order to promote the growth of talent of the college students and give them scope for stage performance.

15) In honor of the academic, social and political contribution of the Chairperson of Mahatma Gandhi Vidyamandir and Mahilaratna Pushpatai Hiray, from the academic year 2019-20, the Mahilaratna Pushpatai Hiray State Level Intercollegiate Singing Competition is being organized by the Department of Music, with the financial assistance of the Board of Student Welfare, Savitribai Phule Pune University, Pune. A large number of students from urban as well as rural areas of Maharashtra State participate in this competition. As the Chief guest for the said competition, well-known classical music singers like; Pt. Sanjeev Abhyankar, Anand Atre, Pt. Shaunak Abhisheki, Pt. Anand Bhate visited and praised the organization of the competition.

16) Pt. Yashwant Deo, Pt. Nathraoji Neralkar, Pt. Satyasheel Deshpande, Salil Kulkarni - Sandeep Khare, Aniket Saraf, Mahagayak Abhijit Kosambi, Urmila Dhangar, Milind Ingle, Anandi Joshi etc. have guided the students at various programmes and workshops organized by the Department of Music.
17) Students of department of Music, who graduated and Post Graduated with music education are earning money as music teachers and have started private music classes.
18) National conferences have been organized by Department of Music with the financial support of Savitribai Phule Pune University.
19) Faculty members equally contribute in research with paper presentation in State & National level conferences.
20) Faculty members published their research papers in National/International, UGC Care listed, Peer Reviewed research journals.
21) Participation of colleagues of the department along with students in various cultural and musical programs organized by the Mahatma Gandhi Vidyamandir is seen.
22) Apart from the college, Students participated in various musical competitions organized at Savitribai Phule Pune University level as well as in musical competitions/programs organized by other universities, colleges and private institutions under the guidance of the teachers of the department.
23) Progression of students studying in the Department of Music is seen, from rural as well as urban areas in classical music singing under the guidance of colleagues in the department.
24) Brilliant performance of the students of the department of music in state level Classical, Semi-Classical, Light Music and Group song singing competitions and receiving prizes.
25) Students of music department are also working as freelancers.
26) On the occasion of Independence Day as well as Republic Day, a special performance of patriotic singing programme was arranged with the spontaneous participation of the students of the department.
27) Students of the department confidently show their talent through music videos.
28) Ishwari Dasakkar, a student who completed her post-graduate studies in music from the department, has performed in the programmes of various TV channels like ; ABP maza, Colors marathi, Zee yuva, DD Sahyadri, Zee 24 Tas and Radio Channels like AIR, Red fm, Radio city Mumbai, Aurangabad, Jalgaon centre and many more.
29) Appointment of Departmental teachers on Ad Hoc Board of Study of Music in Savitribai Phule Pune University is seen.
30) The Department has MoU with 90.4 FM Radio Mast “Its Jabardast” a social radio operated by Mahatma Gandhi Vidyamandir. Students in this department get information about studio recording systems as well as broadcasting, The technique of sound recording is also understood by the students.
31) The basic aim of the faculty members is to provide quality education in traditional classical music to the students enrolled in the department.
32) The department imparts quality education in traditional classical music to students.
33) Students who have completed their post-graduate studies in music have successfully passed the National Eligibility Test in Music under the guidance of the teachers of the department.
34) The students of the department, are pursuing further education like PhD/NET in Music.

ACTING PRINCIPAL
M.P.H. Mahila Mahavidyalaya
Malegaon Camp 423105 (Nashik)

# Department of Music

## Classroom



(Classroom with Musical instrument – Taanpura)



<u>**Musical Instruments Available in the Department**</u>

<u>**(Harmonium & Guitars)**</u>






# Tabla


GPS Map Camera
Malegaon, Maharashtra, India
M.P.H. Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist. - Nashik - 423105
Lat 20.565596°
Long 74.515155°
14/03/2023 09:03 GMT +05:30
434 m
Google



## Electronic Musical Instruments
(Electronic Taanpura, Electronic Tabla)




## Guitars



# Independent Library






<u>**Independent Digital Library**</u>

(Containing with CD's & Cassettes)








Mahatma Gandhi Vidyamandir's

# Mahilaratna Pushpatai Hiray Arts, Science & Commerce

# Mahila Mahavidyalaya,

# Malegaon-Camp,

# Dist. Nashik – 423105

## Department of Music

## Various Activities

## Academic Year: 2022–23

# Vande Mataram

(A patriotic Song Singing Programme Presented by the Students of the Department)

Date – 13 August 2022
















# <u>Aavishkar</u>

## (Research Projects Presentation programme)
## Organized at college level)
## (Students & Faculty Members were participated)
## (Date – 15 September 2022)













Surabhi Dhamne (TYBA, Music Special), a student of music department, while presentation







Vaishnavi Jadhav (TYBA, Music Special), a student of music department, while presentation






Prof. Ashok S. Jadhav (Head,Dept. of Music) while presentation

Prof. Asmita C. Sevekari while presentation




Students & the Professors of the music department with the examiners committee.

**<u>Swarrang - Youth Festival - 2022</u>**

Organized by Savitribai Phule Pune University,Pune

**<u>Zonal Level</u>**

Hosted by at – K.T.H.M. College,Nashik (Maharashtra)

Date – 3 October - 2022




Rjashri Kulkarni (TYBA. Music Special) while presentation a singing



Students of the department while presentation of a group song singing.

.

**<u>Bhaktisamprada</u>**

(A State Level Devotional Song Singing Competition)

Organized by Samajshri Prashantdada Hiray Institute of Music & Fine Arts, Malegaon Camp, Dist. Nashik (Maharashtra)

Date – 13 October 2022




Swaranjali Patil (M.A. Music) while presentation of a devotional song singing




Swaranjali Patil (M.A. Music) while receiving a 2nd rank award by Hon. Sampada Hiray (Trustee,M.G.V.)

<u>**Mahatma Phule Agricultural University, Rahuri**</u>

**18th Maharashtra State Inter-University Youth Festival**

**Indradhanushya - 2022**




Maharashtra State Inter University Youth Festival 'Rainbow 2022' was organized at MahatmaPhule Agricultural University, Rahuri.
In this festival, Savitribai Phule Pune University Pune team became runner-up.
In this winning team, the student of department of music Ms. Swaranjali Patil, M.A. Music, was participated.



**Daily Newspaper – Lokmat, Date – 10/11/2022**

लोकमत

अथर्व वैरागकर ठरला गोल्डन बॉय

# इंद्रधनुष्य महोत्सवात पुणे विद्यापीठ उपविजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'इंद्रधनुष्य २०२२' या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवक महोत्सवाचे उपविजेतेपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाने पटकावले. राहुरी येथे ही स्पर्धा झाली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठात ५ ते ९ नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव पार पडला. यात विद्यापीठाच्या ४० विद्यार्थ्यांच्या संघाने संगीत, साहित्य, ललित कला, नाट्य आणि नृत्य या मुख्य कलाप्रकारातील १५ विविध कलाप्रकारांमध्ये ठसा उमटवला आहे. पुणे विद्यापीठाने महोत्सवातील संगीत विभागाचे सर्वसाधारण विजेतेपदही पटकावले. अथर्व वैरागकर या विद्यार्थ्याला 'इंद्रधनुष्य -२०२२'चा 'गोल्डन बॉय' म्हणून गौरव केला आहे.




इंद्रधनुष्य महोत्सवात उपविजेतेपद पटकावणारा पुणे विद्यापीठाचा संघ.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात ६ विभाग व जिल्हास्तरीय युवक महोत्सव घेतले. त्यात सहभागी विद्यार्थ्यांमधून निवडक २१ मुले आणि १९ मुली असा संघ तयार केला होता. विशेष निवासी शिबिरात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी तयारी केली आणि हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वंकष प्रगतीसाठी विद्यार्थी विकास मंडळ सतत प्रयत्न करीत असते.

\- डॉ. संतोष परचुरे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ

### १८ वा इंद्रधनुष्य २०२२ राज्यस्तरीय युवा महोत्सव :

- प्रथम : शास्त्रीय गायन, शास्त्रीय सुरवाद्य, वेस्टर्न व्होकल सोलो, भारतीय समूहगीत, एकांकिका, कोलाज
- द्वितीय : वेस्टर्न ग्रुप साँग, नाट्यसंगीत, वक्तृत्व, पोस्टर, रांगोळी
- तृतीय : शास्त्रीय तालवाद्य, वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल, स्पॉट पेंटिंग, इंस्टॉलेशन
- गोल्डन बॉय : पुणे विद्यापीठ
- संगीत विभाग : चॅम्पियनशिप
- सर्वसाधारण उपविजेतेपद : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

Hello Pune
Page No. 4 Nov 10, 2022
Powered by: erelego.com

# <u>Swarrang Youth Festival - 2022</u>

Organized by Savitribai Phule Pune University,Pune
Hosted by at – Bharatiya Jain Sanghatana's Arts,Commerce College,Wagholi,Pune (Maharashtra)
Date – 5 & 6 December - 2022







Students of the music department performing a patriotic groupsong




Swaranjali Patil, a student of music department performing a ghazal



Along with the certificates obtained in the said competition, the student contestants,with the principal of the college, Dr. Ujjwala Deore, Head, Department of Music Prof. Ashok S. Jadhav, Prof. Asmita C. Sevekari, Department of Music & Others..

Mahatma Gandhi Vidyamandir's
Mahilaratna Pushpatai Hiray Arts, Science & Commerce
Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp,
Dist. Nashik - 423105

Board of Students Development,
Savitribai Phule Pune University, Pune

&
Department of Music

Mahatma Gandhi Vidyamandir's
Mahilaratna Pushpatai Hiray Arts, Science & Commerce
Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist. Nashik– 423105

Jointly organized

Mahilaratna Pushpatai Hiray
State Level Inter - Collegiate Singing Competition

On 17th January 2023

# **REPORT**

## **Academic Year : 2022–23**

(Year – 4)

**Report**

On the occasion of Hon. Mahilaratna Pushpatai Hiray's birthday, Mahilaratna Pushpatai Hiray Maharashtra State Level Intercollegiate Singing Competition was organized under the guidance of the coordinator of Mahatma Gandhi Vidyamandir, Dr. Apoorva Hiray and the Coordinator of Cultural Affairs Department, Trustee of Mahatma Gandhi Vidyamandir and the Vice chairman of the College Development Committee, Hon. Sampada Hiray on 17th January 2023.
Savitribai Phule Pune University Board of Student Development & Mahatma Gandhi Vidyamandir's Mahilaratna Pushpatai Hiray Arts, Science & Commerce Mahila Mahavidyalaya's Dept. of Music jointly organized Mahilaratna Pushpatai Hiray State Level Intercollegiate Singing Competition on 17th January 2023.

**The competition was conducted in total six singing genres, namely:**

**1) North Indian Classical Music Singing**
**2) Semi-Classical Music Singing**
**3) Indian Light Music Singing**
**4) Western Light Music Singing**
**5) Indian Group Singing**
**6) Western Group Singing**

In this competition 84 contestants from Malegaon, Nashik, Jalgaon, Sakri, Mumbai, Ahmednagar, Pune, Solapur, Sangli, Parbhani, Akola, Amravati, Nagpur etc. participated. The said competition was organized in S.Y.B.A. Hall of, Maharaja Sayajirao Gaikwad College, Malegaon Camp. Pt. Anand Bhate, the famous classical music singer, was present as the Chief guest for the prize distribution ceremony of the said competition along with Karmaveer Bhausaheb Hiray Group's Managing Director & Co-ordinator of Mahatma Gandhi Vidyamandir Institute Dr. Apoorva Hiray, Mahatma Gandhi Vidyamandir Institute Trustee & Chairman of the College Development Committee Sampada Hiray as well as Joint Secretary of Mahatma Gandhi Vidyamandir Dr.V.S. More, Principal Dr. Dinesh Shirude, Principal Dr.Subhash Nikam, Mahilaratna Pushpatai Hiray Mahila Mahavidyalaya's In-charge Principal Dr. Mrunal Bhardwaj were present. The competition was examined by Dr.Ashish Ranade and Mr. Dnyaneshwar Kasar. The winners of this competition were felicitated by the dignitaries by giving cash prizes and mementos.
Following are the competition wise winners of this competition held in total 6 categories.

*** North Indian Classical Music Singing**

1) First Prize - Abhirupa Ramakant Painjane, Shivaji College, Parbhani.
2) Second Prize - Hanumant Navnath Achpale, New Arts, Commerce and Science College, Ahmednagar.
3) Third Prize - Atharva Vairagkar, Savitribai Phule Pune University, Pune

*** Semi-classical Music Singing**
1) First Prize - Sakshi Hebbalkar, Rajarambapu Institute of Technology, Sakharle, Ta. Walwa, Dist. sangli
2) Second Prize - Harshal Bedekar, M. S.G. College, Malegaon Camp.
3) Third Prize - Ashish Khade, Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur

*** Indian Light Music Singing**
1) First Prize - Vaishnavi Nimbulkar, Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur
2) Second Prize - Pragati Kishore Tambat, Arts, Science & P.O Nahta College of Commerce, Bhusawal.
3) Third Prize - Rakshita Devendra Meshram, Shri Shivaji Science College, Amravati.

*** Western Light Music Singing**
1) First Prize - Priyanshu Magar, K. T. H. M. College, Nashik.
2) Second Prize - Sarthak Pachpande, Rajarambapu Institute of Technology, Sakharle, Ta. Walwa, Dist. sangli
3) Third Prize - Sarah Mathew, College of Arts, Science and Commerce, Manmad

*** Indian Groupsong Singing**
1) First Prize - Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur.
2) Second Prize- New Arts, Commerce and Science College, Ahmednagar.
3) Third Prize- Rajarambapu Institute of Technology, Sakharle, Ta. Walwa, Dist. sangli

*** Western Groupsong Singing**
1) First Prize – K. T. H. M. College, Nashik.
2) Second Prize – R.B.H. Kanya Vidyalaya & Jr. College, Malegaon Camp.

*** The best award as a “Rotating cup” of this competition was won by the contestants from Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur.**

While addressing the prize distribution ceremony, the Chief guest Hon. Pt. Anand Bhate said that, the song should be practiced as much as possible to get its proper rendition. It should be compatible with the mood of the song.

Contestants should preserve the heritage of music by giving importance to both education and art. Contestants should participate in the competitions not to get prizes but to learn something new.

Explaining the concept of the competition,Hon. Sampada Hiray, the founder and guide of the competition, said that, the purpose of the competition is to give a platform to the college contestants. We believe that, through this competition, the country will get bright artists. Contestants should keep the artist in them alive till the end. She also expressed her intention to take this state level singing competition to the national level. Coordinator of the Mahatma Gandhi Vidyamandir Dr. Apoorva Hiray in his presidential speech said that, music makes the mind happy. Music helps to reduce stress. The role of music is to establish social harmony and connect people. It has always been valuable. Expressing the fundamental idea that this competition is organized grandly to increase social harmony, unity and to preserve, conserve and promote music on a large scale, he expressed his desire to hold this competition at the national level in the future.

At the beginning of the prize distribution ceremony, the students of the department of music, presented Ishastavan and welcome song under the guidance of Prof. Asmita Sevakari. Principal Incharge of the college Dr. Mrunal Bhardwaj gave a detailed explanation of the progress of the college through the introduction. Prof. Shubhada Joshi, Dr. Meena Patil introduced the guests.

The contestants, Bhushan Meshram & Ms. Sakshi Hebbalkar as well as the examiner of the competition Dr. Ashish Ranade & Dnyaneshwar Kasar expressed their feelings about the competition. The programme was compered by Dr. Premal Deore. Announcement of prizes and vote of thanks was done by Prof. Ashok S. Jadhav Head, Department of Music. The programme concluded with Pasaydana presented by Prof. Asmita Sevekari. Joint Secretary of Mahatma Gandhi Vidyamandir Dr. V. S. More, Dr. Subhash Nikam Principal, M. S.G. College, Principal Dr. Dinesh Shirude, Vice Principal of the college Dr. Dipanjali Borse, Educational Supervisor Dr. Tejaswini Sontakke faculty members, office administrative staff, non-teaching staff, music lovers and students were present in large numbers.

ACTING PRINCIPAL
M.P.H. Mahila Mahavidyalaya
Malegaon Camp 423105 (Nashik)

# Brochure of the Competion



**Introduction of Competition**
**By : Dr. Prashant V. Hiray**
(General Secretary, Mahatma Gandhi Vidyamandir)

## महिलारत्न पुष्पाताई हिरे
## – एक कृतज्ञ दृष्टिक्षेप



शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी १९५२ साली स्थापन केलेल्या व लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या कार्यकाळात अधिकवेगाने विस्तार पावलेल्या महात्मा गांधी विद्यामंदिर शिक्षण संस्थेचा लौकिक आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर आहे. शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे व लोकनेते व्यंकटराव हिरे यांचाच वारसा पुढे चालवणाऱ्या माझ्या मातोश्री, महिलारत्न पुष्पाताई हिरे यांचे राजकीय व सामाजिक कारकीर्दीतील योगदान हे सदैव सर्व समावेशक व लोककल्याणकारी असे राहिलेले आहे. महिलांच्या सर्वंकष विकासासाठी तर त्या आजही आग्रही आहेत. तत्कालीन महाराष्ट्र सरकारमध्ये आरोग्यमंत्री असतांना त्यांचा कार्यकाळ हा दैदिप्यमान म्हणून गौरविला जातो. आजही त्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये हिरिरीने सहभाग घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याने लखलखीत झालेल्या त्यांच्या नावाच्या प्रेरणादाई प्रकाशात पिढ्यान्‌पिढ्या उजळून निघाव्यात, या उदात्त हेतूने नाशिक जिल्ह्यातील, मालेगाव तालुका परिसरातील, तळागाळातील व सर्वसामान्य कुटुंबातील महिला विद्यार्थिनींना मोठ्या संख्येने व सहज शिक्षण घेता यावे म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेने १९९० साली माझ्या मातोश्री श्रीमती पुष्पाताई हिरे यांच्या नावाने कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालयाची मालेगाव कॅम्प,जि.नाशिक (महाराष्ट्र) येथे स्थापना केली.

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणेशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य या तीन विद्याशाखांतील विविध विषयांबरोबरच सर्वसामान्य कुटुंबातील महिला विद्यार्थिनींना संगीत विषयाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना देखील संगीत विषयाचे शास्त्रोक्त शिक्षण घेता यावे यासाठी संस्थेने, या महाविद्यालयामध्ये १९९४-९५ सालापासून संगीत हा विषय सामान्य व विशेष असा पदवी स्तरावर शिकण्यास उपलब्ध करून दिलेला आहे. संस्थेने या महाविद्यालयात संगीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र इमारत उपलब्ध करून दिलेली असून प्रशिक्षित, पूर्णवेळ व पुरेश्या शिक्षक वर्गाबरोबरच अत्यावश्यक वाद्ये तसेच संगीत विषयक स्वतंत्र ग्रंथालय आणि भारतीय शास्त्रीय, उपशास्त्रीय, सुगम व लोकसंगीताबरोबरच पाश्चात्य संगीताच्यादेखील दुर्मिळ व नवीन अश्या विपूल कॅसेट्स व सिडीजचे सुसज्य दालन, श्रवण तसेच अभ्यासासाठी उपलब्ध करून दिलेले आहे.

पुढील काळात महिलांच्या सांगीतिक शिक्षणाची विशेष बाब म्हणून तत्कालीन महाराष्ट्र शासनाने या महाविद्यालयातील संगीत विषयाला १०० % अनुदान मंजूर करून देऊन संगीत विषयाच्या वाढ तसेच प्रचार व प्रसारासाठी मोठे खंबीर पाऊल उचललेले आहे. २००९-१० सालापासून संस्थेने या महाविद्यालयामध्ये संगीत हा विषय पदव्युत्तर स्तरावरदेखील सुरु करून मालेगाव तालुक्यातील महिला, विद्यार्थिनींच्या परिपूर्ण संगीत शिक्षणाची मोठी सोय निर्माण केली आहे. मालेगाव तालुक्यातील महिला विद्यार्थिनींबरोबरच नाशिक जिल्ह्यातील तसेच इतर ठिकाणच्या देखील महिला विद्यार्थिनी या महाविद्यालयात प्रवेश घेऊन संगीत शिक्षणाचा लाभ घेत असून, आतापर्यंत हजारो विद्यार्थिनींनी या महाविद्यालयाद्वारे संगीतातील पदवी तसेच पदव्युत्तर पदवी यशस्वीपणे प्राप्त करून व विविध ठिकाणी संगीत शिक्षक बनून संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी झटत असून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करीत आहेत.

या महाविद्यालयाच्या संगीत विभागाद्वारे आयोजित विविध सांगीतिक कार्यक्रमांमध्ये आजपर्यंत अनेक दिग्गज कलावंतांनी भेटी देऊन कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केलेले असून गायन व वादनाच्या मैफिली सादर केलेल्या आहेत. यामध्ये विशेषत्वाने उल्लेख करावा असे पं.यशवंत देव, पं. नाथरावजी नेरळकर, पं. सत्यशील देशपांडे तसेच महागायक अभिजीत कोसंबी, उर्मिला धनगर, अनिकेत सराफ, सलील कुलकर्णी - संदीप खरे, मिलिंद इंगळे, आनंदी जोशी, पं. संजीव अभ्यंकर , आनंद अत्रे, पं. शौनक अभिषेकी इ. मान्यवरांची श्रेय नामावली आहे.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या कोषाध्यक्षा, माझ्या सहचारिणी डॉ. सौ. स्मिता हिरे यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन व मार्गदर्शन तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक, माझे थोरले चिरंजीव डॉ. अपूर्व हिरे यांच्या भक्कम साथीने, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या समन्वयक व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष तसेच संगीत विषयातील पदव्युत्तर पदवी धारक आणि चित्रपट क्षेत्रात पार्श्वगायिका म्हणून स्वतःचा ठसा उमटवून, भक्तिसंगीतातील मधुधारा व मधुरंग सारख्या ध्वनिफितींच्या माध्यमातून गायिका म्हणून महाराष्ट्रभर सुपरिचित असलेली माझी मुलगी संपदा हिरे, त्याचबरोबर महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या वित्त व मालमत्ता संवर्धन विभागाचे समन्वयक माझे धाकले चिरंजीव डॉ. अद्वयआबा हिरे असे आम्ही सर्व कुटुंबिय संस्थेच्या सर्व महाविद्यालयांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच संगीत विषयाच्या उन्नती तसेच प्रचार व प्रसारासाठीदेखील अत्यंत परिश्रम घेत आहोत. माझ्या सहचारिणी डॉ. सौ. स्मिता हिरे यांच्या काटेकोर व दक्ष नियोजनात आम्ही कुटुंबीयांनी उभारलेल्या तसेच माझ्यासह माझी मुले डॉ.अपूर्व हिरे, संपदा हिरे, डॉ.अद्वयआबा हिरे यांच्या गायकीने नटलेल्या म्युझिक मेनिया ह्या ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून, अनेक कार्यक्रमांद्वारे जमलेली पासष्ट लाख रुपयांची देणगी, आम्ही विविध शैक्षणिक संस्थांना देऊन, शिक्षणाच्या पवित्र कार्याला संजीवनी देण्याची हिरे घराण्याची दातृत्वाची परंपरा वृद्धिंगत केली आहे.

संगीत विषयाची तशीही आम्हा कुटुंबियांना अत्यंत आवड असल्याने माझ्या मातोश्री महिलारत्न पुष्पाताई हिरे यांच्या १७ जानेवारी रोजी असणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या बहुमोल कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व त्यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्याच्या सद्‌हेतुने, राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन गायन स्पर्धांच्या आयोजनाचा विचार माझ्या मनात आला.

शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत,समूह गायन या राज्यस्तरीय गायन स्पर्धांच्या माध्यमातून शास्त्रीय, उपशास्त्रीय व एकूणच संगीताच्या सर्व प्रकारांच्या सर्वकष प्रचार, प्रसार व शिक्षणाला अधिक वेगाने चालना मिळावी या उदात्त हेतुने प्रेरित या स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील संगीत साधक व संगीत प्रेमी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी होऊन या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे हृद्य आवाहन या मनोगताच्या माध्यमातून मी करीत आहे. धन्यवाद!

**डॉ. प्रशांत व्ही. हिरे**
**जनरल सेक्रेटरी,**
**महात्मा गांधी विद्यामंदिर**

# Terms & Conditions of Competition

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित

महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय

संगीत विभाग, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र)

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## महिलारत्न पुष्पाताई हिरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन गायन स्पर्धा

**स्पर्धेचे नियम / अटी**

**उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायन (वैयक्तिक)** – १) या स्पर्धेत विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील केवळ एका स्पर्धकास सहभाग घेता येईल.
२) या स्पर्धेमध्ये स्पर्धकांस कोणत्याही रागातील विलंबित लय/मध्यलय अथवा द्रुतलय ख्याल (खयाल) / बंदिश अथवा तराणा यापैकी कोणताही एक गानप्रकार विस्तृत गायकीसह सादर करावा लागेल. ३) या स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकास कमाल ८ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण अकरा मिनिटे सादरीकरणासाठी वेळ दिला जाईल.
४) या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना लाकडी तानपुरा अथवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा तसेच हार्मोनियम व तबला एवढ्याच वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.

**उपशास्त्रीय संगीत गायन (वैयक्तिक)** – १) या स्पर्धेत विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील केवळ एका स्पर्धकास सहभाग घेता येईल.
२) या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना बिगर फिल्मी नाट्यगीत, ठुमरी, दादरा, टप्पा, कजरी, चैती, होरी यापैकी कोणताही एक गानप्रकार विस्तृत गायकीसह सादर करावा लागेल.
३) या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना लाकडी तानपुरा अथवा इलेक्ट्रॉनिक तानपुरा तसेच हार्मोनियम व तबला एवढ्याच वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.
४) या स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकास सादरीकरणासाठी कमाल ५ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण आठ मिनिटे वेळ दिला जाईल.

**भारतीय सुगम संगीत गायन (वैयक्तिक)** – १) या स्पर्धेत विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील केवळ एका स्पर्धकास सहभाग घेता येईल.
२) या स्पर्धेमध्ये स्पर्धकास मराठी अथवा हिंदी भाषेतील भावगीत, भजन, अभंग, गझल, गैरफिल्मी गीत यापैकी कोणतेही एक सादर करता येईल.
३) या स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकास सादरीकरणासाठी कमाल ५ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण आठ मिनिटे वेळ दिला जाईल.
४) या स्पर्धेत स्पर्धकास हार्मोनिअम,सिंथेसायझर,तबला, ढोलक,ऑक्टोपॅड,गिटार या पैकी कोणत्याही तीन वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.

**पाश्चात्य सुगम संगीत गायन (वैयक्तिक)** – १) या स्पर्धेत विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील केवळ एका स्पर्धकास सहभाग घेता येईल.
२) या स्पर्धेमध्ये स्पर्धकास केवळ इंग्रजी भाषेतील कोणतेही एक गाणे सादर करता येईल.
३) या स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकास सादरीकरणासाठी कमाल ५ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण आठ मिनिटे वेळ दिला जाईल.
४) या स्पर्धेत स्पर्धकास हार्मोनिअम,सिंथेसायझर,तबला, ढोलक,ऑक्टोपॅड,गिटार या पैकी कोणत्याही तीन वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.

**भारतीय समूहगीत गायन** – १) या स्पर्धेत विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील कमाल सहा स्पर्धकांचा एक संघ व तीन संगीत साथीदार सहभाग घेऊ शकतील.
२) या स्पर्धेत स्पर्धक वाद्ये वाजवून गाऊ शकतील.
३) स्पर्धकांना कोणत्याही भारतीय भाषेतील देशभक्ती गीत अथवा लोकगीत असे कोणतेही एक सादर करता येईल.
४) या स्पर्धेसाठी स्पर्धकांस सादरीकरणासाठी कमाल ५ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण आठ मिनिटे वेळ दिला जाईल.
५) या स्पर्धेत स्पर्धकांस हार्मोनिअम,सिंथेसायझर,तबला,
ढोलक, ऑक्टोपॅड, गिटार, डफ, घुंगरू, झांज यापैकी कोणत्याही वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.

**पाश्चात्य समूहगीत गायन** – १) या स्पर्धेमध्ये विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील कमाल सहा स्पर्धकांचा एक संघ व तीन संगीत साथीदार सहभाग घेऊ शकतील.
२) या स्पर्धेत स्पर्धक वाद्ये वाजवून गाऊ शकतील.
३) स्पर्धकांना केवळ इंग्रजी भाषेतील देशभक्तीगीत अथवा लोकगीत असे कोणतेही एक सादर करता येईल.
४) या स्पर्धेसाठी स्पर्धकांना सादरीकरणासाठी कमाल ५ मिनिटे व मंचीय रचनेसाठी ३ मिनिटे अशी एकूण आठ मिनिटे वेळ दिला जाईल.
५) या स्पर्धेत स्पर्धकांस हार्मोनिअम,सिंथेसायझर,तबला, ढोलक,ऑक्टोपॅड,गिटार,डफ,घुंगरू,झांज यापैकी कोणत्याही वाद्यांचा साथीसाठी उपयोग करता येईल.

**सर्वसाधारण नियम/अटी** – १) उत्तर हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत गायन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी स्वतःच्या व महाविद्यालयाच्या नावाचा उल्लेख करून कमाल ५ मिनिटे कालावधीचा साग्रसंगीत व्हिडिओ व उर्वरित सर्व स्पर्धा प्रकारांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी स्वतःच्या व महाविद्यालयाच्या नावाचा उल्लेख करून कमाल ३ मिनिटे कालावधीचा साग्रसंगीत व्हिडिओ रेकॉर्ड करून खाली दिलेल्या व्हॉट्सऍप क्रमांकांवर दिनांक ५ जानेवारी२०२३ पूर्वी पाठविणे.
२) सदर व्हिडिओ परीक्षणाद्वारे निवडक स्पर्धकांची अंतिम फेरीत प्रत्यक्ष सादरीकरणासाठी निवड करून तसे कळविले जाईल.
३) एका स्पर्धा प्रकारात एक याप्रमाणे विद्यापीठ अथवा एका महाविद्यालयातील केवळ एक विद्यार्थी व्यक्तिगत गायन स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ शकेल.
४) उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायन व उपशास्त्रीय संगीत गायन स्पर्धांमध्ये केवळ दोन संगीत साथीदार तर उर्वरित स्पर्धाप्रकारांसाठी तीन साथीदार घेण्यास परवानगी आहे.
५) व्यक्तिगत गायन स्पर्धांसाठी प्रत्येक स्पर्धकास ३००/– रुपये प्रवेश शुल्क आहे तर समूहगीत गायन स्पर्धांसाठी प्रत्येक संघास ५००/– रुपये प्रवेश शुल्क आहे.
६) स्पर्धेचे शुल्क ऑनलाईन भरता येईल.एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.
७) या स्पर्धांमध्ये विद्यापीठांतील तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील.
८) या स्पर्धांसाठी अनुक्रमे कनिष्ठ ते पदव्युत्तर स्तर असा एकच गट आहे.
९) या स्पर्धेसाठी स्पर्धक पाठवू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यापीठाने/महाविद्यालयाने स्पर्धेच्या प्रवेश अर्जावर व अर्जासोबत स्पर्धकांचा फोटो व विद्यापीठात/महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती जोडून व मा. संचालक/ मा. उपसंचालक/मा. प्राचार्य/मा. उपप्राचार्य अथवा संबंधित सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीत पत्राद्वारे पाठविलेल्या स्पर्धकांनाच ग्राह्य धरून स्पर्धेत प्रवेश दिला जाईल.
१०) स्पर्धकांनी तानपुरा, हार्मोनियम व तबला ही आपापली वाद्ये व वादक संगीत साथीदार सोबत आणावेत. आयोजकांच्यावतीनेसुद्धा वाद्य व वादक संगीत साथीदार उपलब्ध केले जातील. ज्या स्पर्धकांना आयोजकांकडून वाद्ये अथवा वादक संगीत साथीदार किंवा दोन्ही हवे असल्यास त्यांनी तशी पूर्वसूचना द्यावी.
११) वेळेचे काटेकोर पालन सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.
१२) परीक्षकांचा निर्णय व निकाल हा अंतिम राहील.
१३) स्पर्धकांना व स्पर्धकांच्या साथीदारांना प्रवास अथवा इतर कोणताही भत्ता दिला जाणार नाही.
१४) बाहेरगावाहून येणाऱ्या स्पर्धकांनी निवास व्यवस्था,चहा, नाश्ता व भोजनाची सोय स्वखर्चाने करावी.
१५) स्पर्धा, स्पर्धेचे स्वरूप, स्पर्धेचा प्रकार, स्पर्धेचे ठिकाण, स्पर्धेची तारीख, स्पर्धेतील बक्षिसांच्या रकमा, स्पर्धेसाठी दिला जाणारा वेळ, काही अपरिहार्य कारणांमुळे स्पर्धा स्थगिती, इत्यादी संभाव्य बदलांबाबत आयोजकांचा निर्णय व अधिकार हा अंतिम राहील व तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.
१६) स्पर्धकांजवळ आपापल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे व स्पर्धेप्रसंगी ते परिधान करणे अनिवार्य राहील.
१७) संगीत साथीदार वगळता सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे दिली जातील.
१८) महापारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते सदर स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके प्रदान केली जातील.
१९) परीक्षकांनी सर्वोत्कृष्ट घोषित केलेल्या विद्यापीठातील अथवा एकाच महाविद्यालयातील दोन किंवा दोनपेक्षा अधिक स्पर्धकांच्या उत्कृष्ट चमूच्या संबंधित महाविद्यालयास फिरता चषक प्रदान केला जाईल.
२०) फिरता चषकप्राप्त संबंधित विद्यापीठाने अथवा महाविद्यालयाने ऑक्टोबर २०२३ मध्ये सदर चषक स्पर्धा आयोजक महाविद्यालयास सुरक्षित व यथास्थिती तसेच स्वखर्चाने परत करणे बंधनकारक आहे.

* **अत्यंत महत्वाची सूचना** – १) स्पर्धकांनी आपले प्रवेश अर्ज व्यवस्थित भरून व संबंधित अधिकाऱ्यांकडून साक्षांकित केल्यानंतर स्कॅन करून mphgayanspardha17Jan2023@gmail.com ह्यामेलवर पाठविणे. तसेच प्रत्यक्ष स्पर्धेच्या दिवशी अर्जाची मूळ प्रत/हार्ड कॉपी जमा करणे अनिवार्य आहे.
२) स्पर्धेचे शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी माहिती.खातेधारकाचे नाव – प्राचार्य, महिलारत्न पुष्पाताई हिरे कला,विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय,मालेगाव कॅम्प,जि. नाशिक
A/C No. 97540200000150 IFSC - BARB0DBMCAM MICR - 423012103
३) ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी लिंक https://forms.gle/1c3L4sRCFxRysa5n7
४) व्हॉट्सऍप ग्रुप जॉईन करण्यासाठी पुढील लिंकवर क्लिक करावे – https://chat.whatsapp.com/EE6nxvDF1hM50XrKIo0MuX

* **संपर्क व व्हिडिओ पाठविणे– १) प्रा. अशोक एस. जाधव**– संगीत विभाग प्रमुख ९३७१९२०६६६ **२) प्रा. अस्मिता चं. सेवेकरी –** संगीत विभाग ९४२३४७७९४२

* सहा स्पर्धांपैकी कुठल्याही एकाच स्पर्धा प्रकारामध्ये स्पर्धकास सहभाग घेता येईल.

# Details about Prizes & Dignitaries

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय
संगीत विभाग, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र)
यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित

## महिलारत्न पुष्पाताई हिरे राज्यस्तरीय गायन स्पर्धेतील पारितोषिके

सर्वोत्कृष्ट संघ – फिरता चषक

**उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायन (वैयक्तिक)**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /– रुपये

**उपशास्त्रीय संगीत गायन (वैयक्तिक)**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /–रुपये

**भारतीय सुगम संगीत गायन (वैयक्तिक)**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /रुपये

**पाश्चात्य सुगम संगीत गायन (वैयक्तिक)**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /– रुपये

**भारतीय समूहगीत गायन**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /– रुपये

**पाश्चात्य समूहगीत गायन**
पारितोषिके
१ प्रथम – ७००१/– रुपये
२ द्वितीय – ५००१/–रुपये
३ तृतीय – २१०१ /–रुपये

**उद्घाटन,स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ स्थळ**

एस. वाय. बी. ए. हॉल, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प,जि.नाशिक – ४२३१०५

**आशीर्वाद**
**महिलारत्न पुष्पाताई हिरे**
अध्यक्षा– महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक

**प्रेरणास्थान**
**समाजश्री मा. डॉ. प्रशांतदादा हिरे**
सरचिटणीस : महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक
**मा. डॉ. सौ. स्मिताताई हिरे**
कोषाध्यक्षाः महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक

**अनमोल सहकार्य**
**मा. डॉ. अपूर्वभाऊ हिरे**
अध्यक्ष : कर्मवीर भाऊसाहेब हिरे ग्रुप
समन्वयक : महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक
**मा. डॉ. अद्वयआबा हिरे**
विश्वस्त : महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक

**संकल्पना व मार्गदर्शक**
**मा. संपदादिदी हिरे**
समन्वयक : जनसंपर्क व कला व्यवस्थापक तथा सांस्कृतिक कार्य विभाग,
महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक
अध्यक्ष : महाविद्यालय विकास समिती

**सहकार्य**
**डॉ. संतोष द. परचुरे**
संचालकः विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**संयोजन समिती**
* डॉ. उज्ज्वला एस. देवरे, प्राचार्य
* डॉ. दीपांजली बोरसे, उपप्राचार्य
* डॉ. तेजस्विनी सोनटक्के, शैक्षणिक पर्यवेक्षक

**संपर्क**
* प्रा. अशोक शे. जाधव (संगीत विभाग प्रमुख) मो. ९३७१९२०६६६
* प्रा. अस्मिता चं. सेवेकरी (संगीत विभाग) मो.९४२३४७७९४२

प्रा.योगिता पाटील (विद्यार्थी विकास अधिकारी) मो. ८२७५००७६१९

# Entry form of Competition

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
विद्यार्थी विकास मंडळ व महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय संगीत विभाग, मालेगाव कॅम्प, जि.नाशिक - ४२३१०५
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## महिलारत्न पुष्पाताई हिरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन गायन स्पर्धा

वर्ष ४ थे

स्पर्धा दिनांक – १७ जानेवारी २०२३

## - प्रवेश अर्ज -

